## अधिसूचना क्रमांक - जानेवारी - २०२६/ एक

खाली नमूद करण्यात आलेल्या विभागीय परीक्षा त्या समोर दर्शविलेल्या कालावधीत घेण्यात येईल.

| अ.क्र. | विभागीय परीक्षा | कालावधी |
|---|---|---|
| १. | समाज कल्याण विभागाच्या आस्थापनेवरील गट अ व गट ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विभागीय परीक्षा | दि. ५ व ६ मार्च २०२६ |

उपरोक्त विभागीय परीक्षेकरिता समाज कल्याण, आयुक्तालयाकडून प्राप्त पत्र **क्र. सकआ/आस्था-६/ गट-अ व गट-ब/परीक्षा आयोजन/२०२४-२५/का-६/२७५९, दिनांक १९/०६/२०२४** च्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या नावांच्या यादीमधील उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येणार आहे. प्रस्तुत परीक्षेचे वेळापत्रक विभाग प्रमुख यांना पाठविण्यात येईल.

| अ.क्र. | विभागीय परीक्षा | विभाग प्रमुख |
|---|---|---|
| १. | समाज कल्याण विभागाच्या आस्थापनेवरील गट अ व गट ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विभागीय परीक्षा | मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१. |

**टीपा: -**

(१) ज्या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास परवानगी दिली आहे, त्यांना परीक्षा प्रवेशपत्र देण्यात येईल. प्रवेशपत्र तसेच ओळखपत्र दाखविल्याशिवाय उमेदवारांना परीक्षा कक्षात व परीक्षेस प्रवेश मिळणार नाही. तसेच परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी स्वत:ची ओळख (Identification) पटवून देण्याकरिता स्वत:चे पॅनकार्ड, आधारकार्ड, निवडणूक कार्यालयाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसेंन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी **किमान एक ओळखपत्र मूळ प्रतीत व त्याची एक छायांकित प्रत** तसेच कार्यालयाने दिलेले स्वत:चे ओळखपत्र मूळ प्रतीत सोबत आणणे आवश्यक आहे.

(२) विभागीय परीक्षांचे निकाल घोषित झाल्यानंतर ज्या उमेदवारांना गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी निकालाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत विभाग प्रमुखांकडे अर्ज पाठविणे आवश्यक आहे. उमेदवारांकडून प्राप्त झालेले अर्ज विभाग प्रमुखांनी बार्टीकडे पाठवितांना त्यांनी विहित मुदतीत अर्ज केला आहे व गुणांच्या पडताळणी शुल्कापोटी प्रत्येक विषयास रुपये १००/- प्रमाणे कोर्ट फी स्टॅम्प लावले आहेत याची विभाग प्रमुखांनी प्रथम खात्री करुन बार्टीने दिलेल्या मुदतीच्या आत बार्टी कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. **उमेदवारांकडून विहित शुल्कासह विभाग प्रमुखांमार्फत न आलेल्या अर्जाचा बार्टीकडून विचार केला जाणार नाही.** याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(३) विभागीय परीक्षेच्या पारंपारिक स्वरुपाच्या उत्तरपत्रिकेकरिता गुणांची पडताळणी करण्यात येते, फेरमुल्यांकन केले जात नाही.

(विशाल लोंढे)
**निबंधक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**तथा सदस्य सचिव**
**परीक्षा नियोजन समिती गट अ व ब**

(सुनील वारे)
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**तथा सदस्य**
**परीक्षा नियोजन समिती गट अ व ब**

## समाज कल्याण विभागामधील गट अ व गट ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विभागीय परीक्षा विभागीय परीक्षेचा कार्यक्रम (मार्च - २०२६)

| वार व दिनांक | वेळ | समाज कल्याण विभागाच्या आस्थापनेवरील गट अ व गट ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विभागीय परीक्षा | गुण |
|---|---|---|---|
| गुरुवार दि. ५ मार्च २०२६ | सकाळी १०:०० ते ०१:०० (तीन तास) | पेपर क्र. १ बॉम्बे सिव्हील सर्व्हिसेस रुल्स, वगैरे (पुस्तकांसह)<br>Q. 1 Bombay Civil Services Rules etc. | १०० |
| | दुपारी ०२:३० ते ०५:३० (तीन तास) | पेपर क्र. २ बॉम्बे फायनान्शियल रुल्स, वगैरे (पुस्तकांसह)<br>Q. 2 Bombay Financial Rules etc. | १०० |
| शुक्रवार दि. ६ मार्च २०२६ | सकाळी १०:०० ते ०१:०० (तीन तास) | पेपर क्र. ३ भारतीय वन अधिनियम, वगैरे (पुस्तकांसह)<br>Q. 3 Indian Forest Act etc. | १०० |
| | दुपारी ०२:३० ते ०५:३० (तीन तास) | पेपर क्र. ४ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, वगैरे (पुस्तकांशिवाय)<br>Q. 4 Maharashtra Co-Operative Societies Act 1960, etc. | १०० |

**परिक्षा केंद्र - बार्टी येरवडा संकूल, सफाई कर्मचाऱ्यांच्या मुलां-मुलींची शासकीय निवासी शाळा, कॉमरझोन आय.टी पार्क जवळ, येरवडा, पुणे. ४११ ००६.**

**सूचना:**

१. एखाद्या विषयात/ विषय समूहात मागील परीक्षेस जर सूट मिळाली असेल व त्यामुळे विभाग प्रमुखांनी अशा उमेदवारास संबंधित विषयासाठी / विषय समूहासाठी प्रवेश दिला नसतानाही तो त्या विषयास / विषय समूहास पुन्हा बसला तर पूर्वी मिळालेली सूट रद्द ठरविण्यात येईल.

२. ज्या उमेदवारांना विभाग प्रमुखांनी परीक्षेस बसण्यास परवानगी दिली आहे, त्यांना विभाग प्रमुखांमार्फत परीक्षा प्रवेशपत्र व उमेदवारांना सूचनांची प्रत देण्यात येईल. प्रवेशपत्र तसेच ओळखपत्र दाखविल्याशिवाय उमेदवारांना परीक्षा कक्षात व परीक्षेस प्रवेश मिळणार नाही. तसेच परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी स्वत:ची ओळख (Identification) पटवून देण्याकरिता स्वत:चे पॅनकार्ड, आधारकार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसेंन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान एक ओळखपत्र मूळ प्रतीत व त्याची एक छायांकित प्रत साक्षंकित केलेली तसेच कार्यालयाने दिलेले स्वत:चे ओळखपत्र मूळप्रतीत सोबत आणणे आवश्यक आहे.

३. उत्तरे लिहिण्यासाठी मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त पुरवणी म्हणून अन्य उत्तरपुस्तिका उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

४. ज्या प्रश्नपत्रिकांची उत्तरे पुस्तकांच्या सहाय्याने लिहावयाची आहेत, अशा वेळी उमेदवारांनी विभागाने प्रमाणित केलेली शासन प्रकाशित अधिकृत पुस्तके (स्वत:ची) (यथास्थिती केवळ बेअर ॲक्टस आणि / किंवा रुल्स) वापरावी. परीक्षेसाठी असलेल्या कोणत्याही प्रश्नपत्रिकेवरील टिपण्या असलेली पुस्तके, मार्गदर्शिका किंवा पेजर, स्मार्ट वॉच, मोबाईल फोन, साधे किंवा प्रोग्रामेबल कॅलक्युलेटर वा नकाशे,इत्यादी वस्तू परीक्षा कक्षामध्ये आणण्याची उमेदवारांना सक्त मनाई आहे. सदर सूचनेचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास ती बाब शिस्तभंग असल्याचे समजण्यात येईल व बार्टीमार्फत तसेच विभागाचे मार्फत कारवाई केली जाईल. उमेदवारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत कोणतीही पुस्तके पुरविली जाणार नाहीत.

५. परीक्षेच्या नियमामध्ये प्रमाणित केल्याप्रमाणे उमेदवारांना प्रश्नांची उत्तरे इंग्रजी किंवा मराठीमध्ये लिहिण्याची मुभा आहे. परंतु उत्तरपुस्तिकेत ज्या भाषेत उत्तर लिहिणे सुरु केले असेल, त्याच भाषेत त्या उत्तरपुस्तिकेत शेवटपर्यंत उत्तरे लिहिली पाहिजेत. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी भाषेतच काढल्या जातील.

६. उमेदवारांने प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना [अ,ब,क,ड किंवा १, २, ३, ४] सलगरित्या सोडवावेत. प्रश्नांचा एक भाग एका पृष्ठावर तर दुसरा भाग काही पृष्ठे सोडून अथवा काही अन्य पृष्ठावर उपप्रश्न सोडविल्यास तो उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात येईल व अशा प्रश्नांच्या उत्तरांना शून्य गुण समजण्यात येतील.

७. (अ) सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांमध्ये काही दोष आढळल्यास, त्यासंबंधीचे लेखी निवेदन उमेदवाराने मा. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे ४११००१ यांच्याकडे स्वत:च्या तपशिलासह टपालाने परीक्षेच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत विभागप्रमुखामार्फत सादर करावे. तदनंतर आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत. या दोषांबाबत पर्यवेक्षक / समवेक्षक यांच्याकडे विचारणा किंवा चर्चा करु नये.

(ब) उमेदवारांनी विभागीय परीक्षेशी संबंधित **प्रश्नपत्रिकेतील त्रुटी संदर्भातील पत्रव्यवहार वगळता अन्य पत्रव्यवहार थेट बार्टीशी न करता तो विभाग प्रमुखामार्फत परीक्षा समितीचे सदस्य तथा महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे. यांचे नावे करावा.** याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. विभागीय परीक्षांचे निकाल घोषित झाल्यानंतर ज्या उमेदवारांस गुणांची पडताळणी करुन घ्यावयाची आहे. अशा उमेदवारांनी निकालाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत विभाग प्रमुखांकडे अर्ज पाठविणे आवश्यक आहे. उमेदवारांकडुन प्राप्त झालेले अर्ज विभाग प्रमुखांनी बार्टी कार्यालयाकडे पाठवितांना त्यांनी विहित मुदतीत अर्ज केला आहे व गुणांच्या पडताळणी शुल्कापोटी प्रत्येक विषयास रुपये १००/- प्रमाणे कोर्ट फी स्टॅम्प लावले आहेत, याची विभाग प्रमुखांनी प्रथम खात्री करुनच ते उमेदवारांच्या अर्जाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत बार्टीकडे पाठविणे आवश्यक आहे. **उमेदवारांकडून विहित मुदतीत विहित शुल्कासह विभाग प्रमुखांमार्फत न आलेल्या अर्जाचा बार्टीकडून विचार केला जाणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

९. दिनांक ०५/१०/२०२१ च्या शासन निर्णयानूसार दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना भरपाई वेळ म्हणून प्रती तास २० मि. अधिक देण्यात येतील व शासन निर्णयानूसार इतर नियम लागू राहतील.

**१०. विभागीय परीक्षेच्या पारंपारिक स्वरुपाच्या उत्तरपुस्तिकेकरिता गुणांची पडताळणी करण्यात येते, फेरमुल्यांकन केले जात नाही.**

११. परीक्षेत अनधिकृत साहित्याआधारे नक्कल करण्यास किंवा दुसऱ्या उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेवरुन नक्कल करण्यास वा दुसऱ्या उमेदवारांकडून नियमबाह्य मदत घेण्यास किंवा दुसऱ्या उमेदवाराला नियमबाह्य मदत देण्यास अथवा तसा प्रयत्न करण्यास अथवा वारंवार आपल्या जागेवरुन उठण्यास सक्त मनाई आहे. खाजगी प्रकाशनाची पुस्तके वापरल्यास या सूचनेचे उल्लंघन करणारा उमेदवार शिस्तभंग कारवाईच्या तरतुदी अन्वये कारवाईस पात्र ठरेल.

१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे ची उत्तरपत्रिका ही बार्टीची मालमत्ता असून ती अनधिकृतरित्या हाताळणे वा स्वत:जवळ बाळगणारी व्यक्ती कारवाईस पात्र ठरेल.

१३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे संस्थेने विभागीय परीक्षा संदर्भाने केलेल्या सूचनांचे उमेदवाराने अत्यंत काळजीपूर्वक पालन करावे. सूचनांचे पालन न करणारा उमेदवार परीक्षा कक्षाबाहेर घालवून देणे, गुण वजा करणे, पुढील परीक्षांना प्रतिरोधित करणे, उमेदवारी रद्द करणे, इत्यादी शिक्षा देण्यास पत्र ठरेल. शिक्षा देण्याचा अधिकार सर्वस्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे संस्थेचा राहील.

१४. प्रश्नपत्रिकेत नेमून दिलेला वेळ संपल्यावर कोणत्याही उमेदवाराने त्याचे/तिचे उत्तर लिहू नये किंवा त्यात फेरफार करू नये. प्रश्नपत्रिकेत नमूद केलेला वेळ संपण्यापूर्वी पाच मिनीटे पूर्व सूचनेची घंटा दिली जाईल. दुसरी घंटा झाल्यानंतर परिक्षार्थीने लिहिणे किंवा उत्तरात फेरफार करणे थांबविले पाहीजे.

१५. उत्तरे लिहीण्यासाठी परिक्षार्थींनी स्वत:चे बॉलपेन आणले पाहीजे. उत्तरपत्रिका बार्टीकडून पुरविल्या जातील. फक्त निळी, काळी शाईचे बॉलपेन वापरावे. इतर प्रकारची शाई, चमकणारी शाई किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास सक्त मनाई आहे. या सुचनाचे उल्लंघन झाल्यास अशी उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही.

१६. प्रत्येक प्रश्नपत्रिकेवरील सुचनेप्रमाणे परिक्षार्थींनी प्रश्न सोडविले पाहीजेत. जर विहित संख्येपेक्षा अधिक प्रश्न सोडविले तर विहीत संख्येपर्यंत अगोदर सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे तपासली जातील. उरलेल्या प्रश्नांची उत्तरे दुर्लक्षित केली जातील. परिक्षार्थीने एका प्रश्नाचे उत्तर दोनदा लिहिल्यास तपासावयाचे नसलेले एक उत्तर रद्द समजण्याबाबत परिक्षार्थीने त्या उत्तरावर "उत्तर रद्द" असा शेरा नमूद करावा.

१७. **परीक्षा कक्षामधून बाहेर जाण्याबाबत** -

**अ)** प्रश्नपत्रिका परिक्षार्थींना वाटप केल्यापासून पाऊनतास (४५ मि.) उलटेपर्यंत कोणत्याही परिक्षार्थीला परिक्षा कक्षाबाहेर जावू देता येणार नाही.

**ब)** परिक्षा चालू असताना एखाद्या परिक्षार्थीला प्रसाधन कक्षास जावयाचे असेल तर त्याने /तिने बाहेर जाण्यापूर्वी समवेक्षक / पर्यवेक्षकांची परवानगी घेतली पाहिजे. तशी परवाणगी घेतली नसल्यास त्यास /तीस परिक्षा कक्षामध्ये पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही.

**क)** जर एखाद्या परिक्षार्थीस परिक्षा सुरू झाल्यानंतर पाऊनतासानंतर परंतू परिक्षेची वेळ संपण्यापूर्वी जावयाचे असल्यास त्याने /तिने जाण्यापूर्वी समवेक्षकाकडे त्यांची /तिची उत्तरपुस्तिका दिली पाहीजे. जे अंतिम वेळेपर्यंत शेवटी राहतील त्यांनी समवेक्षकांने उत्तरपत्रिका घेईपर्यंत आपापल्या जागेवर बसून राहिले पाहिजे.

**ड)** वरील (अ), (ब) व (क) च्या अधिन राहून कोणत्याही परिक्षार्थीने कोणत्याही कारणास्तव पर्यवेक्षकांच्या परवाणगीशिवाय आपली जागा सोडू नये.

**१८). उत्तरपुस्तिकेत प्रश्नाच्या वास्तविक उत्तराव्यतिरीक्त कोठेही नांव, बैठक क्रमांक, किंवा इतर अनावश्यक मजकूर लिहू नये, तसेच कोणत्याही नावाने स्वाक्षरी करू नये अथवा अन्य कोणतेही चिन्ह काढू नये किंवा ओळख पटविण्यासाठी कोणत्याही प्रकारची सांकेतिक खूण किंवा आकृती काढू नये.**

**उपरोक्त सर्व सुचनांचे परिक्षार्थींना पालन करणे आवश्यक आहे, सुचनांचे उल्लंघन करणारा परिक्षार्थी शिस्तभंग कारवाईच्या तरतूदी अन्वये कारवाईस पात्र ठरेल.**

ठिकाण : पुणे.
दिनांक : 03/02/२०२६

(विशाल लोंढे)
**निबंधक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**तथा सदस्य सचिव**
**परीक्षा नियोजन समिती गट अ व ब**

(सुनील वारे)
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**तथा सदस्य**
**परीक्षा नियोजन समिती गट अ व ब**

**दि. ५ व ६ मार्च २०२६ होणाऱ्या समाज कल्याण विभागमधील गट अ व ब संवर्गातील परीक्षेच्या अनुषंगाने अभ्यासक्रम**

| **परिक्षेचे विषय** | **विषयाची अधिकृत पुस्तके** |
|---|---|
| पेपर क्रमांक- १<br>बॉम्बे सिव्हिल सर्व्हिसेस रुल (**पुस्तकासह**) | १. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वर्तणूक), १९७९<br>२. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व अपिल), १९७९<br>३. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (रजा), १९८१<br>४. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वेतन), १९८१<br>५. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (पदग्रहण, निलंबन कालावधी स्वियेत्तर सेवा या कालावधीतील प्रदाने), १९८१<br>६. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सेवेच्या सर्व साधारण शर्ती), १९८१<br>७. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्ती वेतन), १९८२ |
| पेपर क्रमांक- २<br>बॉम्बे फायनान्सियल रुल<br>**(पुस्तकासह)** | १. मुंबई वित्तीय अधिनियम १९५९<br>२. महाराष्ट्र कोषागार अधिनियम, १९६८<br>३. महाराष्ट्र आकस्मिक खर्चअधिनियम, १९६५ |
| पेपर क्रमांक- ३<br>इंडियन फॉरेस्ट ॲक्ट वगैरे<br>**(पुस्तकासह)** | १. भारतीय वन अधिनियम १९२७<br>२. महाराष्ट्र वन कायदा १९७२<br>३. जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१<br>४. ग्रामपंचायत अधिनियम १९५९ |
| पेपर क्रमांक - ४<br>महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, वगैरे<br>**(पुस्तकाशिवाय)** | १. महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट - १९६०<br>२. अस्पृश्यता अपराध कायदा - १९५५<br>३. पंचवार्षिक योजना(मागासवर्गीयांच्या योजनांच्या विशेष संदर्भात)<br>४. सफाई कामगारांच्या राहणीमानाच्या चौकशी समितीचा अहवाल<br>५. राज्य सरकारने मागासवर्गीयांना दिलेले विशेष अधिकार |

(विशाल लोंढे)
**निबंधक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**तथा सदस्य सचिव**
**परीक्षा नियोजन समिती गट अ व ब**

(सुनील वारे)
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**तथा सदस्य**
**परीक्षा नियोजन समिती गट अ व ब**

## दि. ५ व ६ मार्च २०२६ होणाऱ्या समाज कल्याण विभागामधील गट-अ व गट -ब संवर्गातील विभागीय परीक्षा पात्र परीक्षार्थी

√ = पेपर देणे अनिवार्य

| अ. क्र | परिक्षार्थीचे नाव | कार्यालयाचा पत्ता | पेपर क्र. १ | पेपर क्र. २ | पेपर क्र. ३ | पेपर क्र. ४ | परीक्षा संधी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. मिना अशोक आंबाडेकर | प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे, विभाग पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, आळंदी रोड, येरवडा, पुणे - ०६ | सुट | सुट | सुट | √ | ४ |
| २ | श्रीम. प्रभे शालिनी बंसीधर | सह आयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय पुणे, चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे | √ | √ | √ | √ | १ |
| ३ | श्रीम. मोरे अश्विनी पांडुरंग | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण धुळे कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिंचन भवनच्या मागे, साक्री रोड, धुळे | √ | √ | √ | √ | १ |
| ४ | श्रीम. बोबडे एस. एस. | प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पोलीस आयुक्तालयाच्या मागे, अमरावती. | √ | √ | √ | √ | १ |
| ५ | श्रीम. तिजारे ज्योत्स्ना अशोकराव | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यवतमाळ, पळसवाडी कॅम्प यवतमाळ | √ | √ | √ | √ | १ |
| ६ | श्री. चोंडकर राहुल श्रीराम | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण वाशिम, नालंदा नगर,चिखली सुर्वे रोड, ता. जि. वाशिम-४४४५०५ | √ | √ | √ | √ | १ |
| ७ | श्री. कौरती सुरेश गणपतराव | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गडचिरोली, एल. आय. सी. चौक, आय. टी. आय. च्या मागे, गडचिरोली - ४४२६०५ | √ | √ | √ | √ | १ |
| ८ | श्री. राणे नंदकुमार सोपान | गृहप्रमुख, २५० मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, पिंपरी चिंचवड मोशी, सेक्टर क्र. ४,स्पाईन रोड, संतनगर, पथ क्र. ०८, अॅकॉर्ड हॉस्पिटल शेजारी - ४१२१०५ | √ | √ | √ | √ | १ |
| ९ | श्री. सराफ नवनीतकुमार दत्तात्रय | १००० मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह, युनिट क्र. १ लातूर, खंडापूर रोड, CRPF कॅम्प जवळ, लातूर | √ | √ | √ | √ | १ |
| १० | श्रीम. सुकळकर कविता धोंडबाराव | १००० मुला-मुलीचे शासकीय वसतिगृह, युनिट क्र. ४ न्यु MIDC लातूर - ४१३५१२ | √ | √ | √ | √ | १ |

| अ. क्र | परिक्षार्थीचे नाव | कार्यालयाचा पत्ता | पेपर क्र. १ | पेपर क्र. २ | पेपर क्र. ३ | पेपर क्र. ४ | परीक्षा संधी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | श्रीम. रायते नंदा श्रावण | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जळगाव | √ | √ | √ | √ | १ |
| १२ | श्रीम. घट्टारे (मट्टे) पी. आर. | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,मुंबई शहर, प्रशासकीय इमारत, चौथा मजला, आर. सी. चेंबुरकर मार्ग, चेंबूर, मुंबई - ७१ | √ | √ | √ | √ | १ |
| १३ | श्री. केंद्रे विलास सुधाकरराव | प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण विभाग, लातूर - ४१३५१२ | √ | √ | √ | √ | १ |
| १४ | श्री. केदार अंकेश माणिकराव | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, वर्धा महिला आश्रम जवळ सेवाग्राम रोड, वर्धा - ४४२००१ | √ | √ | √ | √ | १ |
| १५ | श्रीम. घनसावंत करुणा यादवराव | संत तुकाराम मुलांचे शासकीय वसतिगृह, किलेअर्क, छ.संभाजीनगर - ४३१००१ | √ | √ | √ | √ | १ |
| १६ | श्रीम. निकाळे शर्मिला रविंद्र | १००० मुलांचे शासकीय वसतिगृह, किलेअर्क, छ. संभाजीनगर | √ | √ | √ | √ | १ |
| १७ | श्रीम. थिटे सुनिता रामकृष्ण | प्लॉट न. ९ नवीन पुष्पनगरी मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पष्पनगरी, छ. संभाजीनगर | √ | √ | √ | √ | १ |
| १८ | श्रीम. नरहरे मीनाक्षी जनार्दन | २५० मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, मोशी, पिंपरी-चिंचवड, पुणे. सेक्टर ४. पथ क्र. 8, संतनगर, स्पाईन रोड, मोशी, प्राधिकरण, पुणे. ४१२१०५ | √ | √ | √ | √ | १ |
| १९ | श्रीम. सुतार पद्मा भागवत | १००० मुला/मुलींचे शासकीय वसतीगृह, युनिट 1, विश्रांतवाडी, पुणे. पिन. ४११००६ | √ | √ | √ | √ | १ |

(विशाल लोंढे)
**निबंधक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**तथा सदस्य सचिव**
**परीक्षा नियोजन समिती गट अ व ब**

(सुनील वारे)
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**तथा सदस्य**
**परीक्षा नियोजन समिती गट अ व ब**